# बृहन्मुंबई महानगरपालिका

**घन कचरा व्यवस्थापन जी/दक्षिण विभाग**

**सहा. अभि.(घकव्य)/जीद/2454/दि.17.12.2024**

## स्वारस्य अभिव्यक्ती (E.O.I.)

## जाहिरात

जी/दक्षिण विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यात स्वच्छतेबाबत साफसफाईच्या कामाकरिता **"स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान" (वस्ती स्वच्छता योजना)** योजना राबविण्यासाठी जी/दक्षिण विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या ईच्छुक स्थानिक नोंदणीकृत सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा, सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याकरिता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

| अनु. क्र. | विभाग | योजनेचे नाव |
|---|---|---|
| **1.** | **जी/दक्षिण विभाग** | **स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान (वस्ती स्वच्छता योजना)** |

अर्जाचा नमुना **जी/दक्षिण** विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे अर्ज छाननी शुल्क रु.1320 /- + रु.238 /- (18% वस्तू व सेवा कर) = एकुण **रु.1558/-** रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बॅकेचा डी.डी. **बृहन्मुंबई महानगरपालिका** (BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION) या नावाने (ना-परतावा) नागरी सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर अर्ज दि**.18.12.2024** ते दि**. 23.12.2024** सकाळी **11.00** ते सायं**. 05.30** वाजेपर्यंत (दुसरा व चौथा शनिवार वगळून) या वेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक जी/दक्षिण विभाग कार्यालय येथे सूचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थाना कामाचे वाटप संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील, प्रत्येक कामासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र रक्कम भरणे आवश्यक आहे.

ईच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी **'जी/दक्षिण'** घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क साधावा. संस्थंने जी/दक्षिण विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारिख दि**.24.12.2024 दुपारी 01.00** वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**
**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.)**
**जी/दक्षिण विभाग**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**<u>घन कचरा व्यवस्थापन खाते, जी/दक्षिण विभाग</u>**

**<u>अर्जा सोबत जोडावयाचे कागदपत्रे</u>**

**<u>पात्रता व अटी (SMPA 2024)</u>**

1) अर्जदार संस्था जी/दक्षिण विभागातील स्थानिक नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. तसेच सदर संस्थेची नोंदणी कमीत कमी दोन वर्षांपुर्वीची (दि.31 मार्च 2022 किंवा तत्पुर्वी) असावी.
2) अर्जदार संस्थांनी संस्थेची उपविधी / घटना याची प्रत जोडणे बंधनकारक राहील.
3) अर्जदार संस्था या महानगरपालिकेत कंत्राटदार म्हणून नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे (म.न.पा. मध्ये वेंडर क्रमांक तसेच ई-मेल आय.डी. ची नोंद असणे आवश्यक आहे).
4) संस्थेचे आर्थिक व्यवहार असलेले बँकेचे नाव व खाते क्र. असलेल्या बँकेच्या खाते पुस्तकाची प्रत तथा बँक स्टेटमेन्ट अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
5) शपथपत्र (रु.100/- किंमतीच्या मुद्रांकीत स्टँप पेपरवर) निविदा अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.
6) स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान (वस्ती स्वच्छता योजना) मध्ये सहभागी होण्याबाबतच्या ठरावाची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
7) संस्थेचा सध्याच्या पदाधिका-यांची नावे, पत्ते, संपर्क क्रमांक अर्जामध्ये नमूद करणे तसेच त्यांची छायांकीत प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
8) अर्जदार संस्थेचा अध्यक्ष, सचिव, खजिनदार हा दुस-या संस्थेच्या पदावर कार्यरत नसावा, असे निदर्शनांस आल्यास सदर अर्ज सोडतीपुर्वी किंवा सोडतीनंतर बाद करण्यात येईल.
9) संस्थेचे अलिकडील एक वर्षाचा (सन 2022-23 व सन 2023-24) लेखा परिक्षण अहवाल अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
10) विषयांकीत कामाच्या अर्ज छाननी शुल्क रु.1320 /- अधिक 18% वस्तु व सेवा कर (GST) असे एकुण रु.1558 /- (ना-परतावा) म.न.पा. च्या नागरी सुविधा केंद्र येथे भरण्यात यावे.
11) अर्ज छाननी शुल्क भरणा चलन दि.18/12/2024 ते दि.23/12/2024 रोजी सकाळी 11.00 ते सायं. 05.30 वाजेपर्यंत (साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टी वगळता) कार्यालयामार्फत देण्यात येईल. सदर वेळेनंतर आलेल्या संस्थांना अर्ज शुल्क भरणा चलन देण्यात येणार नाही.
12) अर्ज स्विकारण्याची **अंतिम तारीख दि.24/12/2024 रोजी दुपारी 01.00** वाजेपर्यंतच असून त्यानंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
13) अर्ज हे फक्त बंद लिफाफ्या मध्येच स्विकारले जातील. तसेच लिफाफ्यावरती **"स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान 2025"** असा उल्लेख करावा.
14) जर एखादी संस्था दिलेले काम करण्यास असमर्थ ठरली तर दुस-या संस्थेची नेमणूक सोडत पध्दतीने प्रतिक्षा यादीकरीता निवडण्यात आलेल्या संस्थांमधून मा. सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण यांच्या मंजुरीने सोडत पध्दतीने करण्यात येईल व दंड म्हणून अशा असमर्थ संस्थेचे नाव काळया यादीत टाकण्याचे प्रस्ताविण्यात येईल.
15) अर्ज पुर्ण भरलेला असावा. अपूर्ण/अयोग्य अर्ज कोणताही पत्र व्यवहार न करता फेटाळण्याचे तसेच विषयांकीत कामाचा कालावधी तथा मनुष्यबळाची संख्या ही परिस्थितीनुसार कमी-अधिक करण्याचा तथा सदर कामास स्थगिती देण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग ह्यांचे राहतील.

सही/

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.)**

**जी/दक्षिण विभाग**